सं. फौजदारी खटला क्र. <u>१०१५/२०२२</u>
श्रीराम बिल्डींग विरूद्ध सुखलालजी
**निशाणी २० खाली**

<u>**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ फिर्यादी मनोज बाबुलाल चंदन याची उर्वरित उलटतपासणी शपथेवर सुरू**</u> — <u>**आरोपीतर्फे ॲड श्री. डी. डी. वर्मा यांचे मार्फत.**</u>

३. मी माझे आयकर विवरण पत्र व ताळेबंद न्यायालयात दाखल करू शकतो.

प्र. तुम्ही सन २०२२ चा रोजमेळ न्यायालयात दाखल करू शकता का ?
उ. मी रोजमेळ दाखल करू शकत नाही कारण तो एकाचा नसतो. त्यात सर्व गि—हाईकांची माहिती असते.

४. माझेकडे सन २०२२ चा रोजमेळ आजरोजी उपलब्ध नाही. आरोपी सोबत झालेल्या व्यवहाराचा नोंद मी रोजमेळात केलेली नाही.

प्र. ताळेबंदामध्ये तुम्ही सुखलाल बन्नावडे या नावाने नोंद केली आहे का ?
उ. ताळेबंदामध्ये नावानिशी नोंद येत नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, ज्याच्याकडुन पैसे येणे बाकी असतात त्याच्या नावाची नोंद ताळेबंदात घेतली जाते.

६. मी रितेश सुखलाल बन्नावडे याला ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, रितेश सुखलाल बन्नावडे याचेसोबत माझा दोस्ताना होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याचेसोबत माझे आर्थिक व्यवहार होते. हे म्हणणे खरे नाही की, मी रितेश सुखलाल बन्नावडे याला व्याजाने पैसे देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी रितेश सुखलाल बन्नावडे याचेकडुन सुरक्षेच्या हमीपोटी धनादेश घेत होतो.

७. आरोपीचा विटभट्टा करोडी गावी होता. आरोपीचा करोडी येथे विटभट्टा होता त्याबाबत कुठलेही कागदपत्र मी अभिलेखावर दाखल केलेले

नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा कधीही विटभट्टा नव्हता. साक्षीदार सांगतो की, त्याने आता बंद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा मातीच्या मुर्त्या बनवण्याचे काम करत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा पुर्वीपासुन मजुरी करतो व त्याचा कोणताही व्यवसाय नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला वादातील धनादेश दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादातील धनादेश मला आरोपीच्या मुलाने दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत कोणताही व्यवहार झालेला नसल्यामुळे त्याबाबत तारिख फिर्याद व पुराव्याच्या प्रतिज्ञालेखात नमुद केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडुन मला कोणतीही रक्कम कायदेशीर येणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटा व्यवहार दर्शविला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विट पुरवठादार नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत कोणताही व्यवहार झालेला नसल्यामुळे त्याबाबत नोंद रोजमेळात व ताळेबंदात केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत झालेल्या व्यवहाराची नोंद रोजमेळात नसल्यामुळे तो दाखल करण्यास मी तयार नाही. मी पुढील तारखेस माझा ताळेबंद दाखल करण्यात तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या मुलाने मला धनादेश दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या धनादेशाचा दुरूपयोग करून प्रस्तुत खोटी केस केली व आजरोजी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०९.१२.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.